संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
29 MAY 2026
प्राप्त झाले सही..........................

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, संचालक संवर्गातील अधिकारी यांच्या प्रशासकीय बदलीबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन आदेश :-संलेको-२०२६/प्र.क्र.५८/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २९.०५.२०२६.

## शासन आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील, संचालक संवर्गातील (एस-२९ : १३११००-२१६६००) खालील विवरणपत्रात नमुद अधिकाऱ्यांना महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार खालील विवरणपत्रातील स्तंभ ३ मध्ये नमुद पदावर प्रशासकीय बदलीने पदस्थापना करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व कार्यालय | प्रशासकीय बदलीचे पद व कार्यालय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | श्री.संजय भिमराव अनपट, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे | मुख्य लेखा परीक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई |
| २ | श्रीमती राजश्री मिलींद राऊत, संचालक (अर्थ व लेखा कक्ष), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | वित्त व लेखा अधिकारी, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई |
| ३ | श्री.प्रमोद भिमराव भोसले, मुख्य लेखा परीक्षक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे | मुदतवाढ |
| ४ | श्री. किरणकुमार बापुराव धोत्रे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर | मुदतवाढ |
| ५ | श्री. गिरीश नामदेव देशमुख, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई | मुदतवाढ |
| ६ | श्री. विकास विनायक देसाई, वित्त व लेखा अधिकारी, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई | संचालक (अर्थ व लेखा कक्ष), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई |

| | | |
|---|---|---|
| ७ | श्री. धनराज मदन गरड, मुख्य लेखा अधिकारी, शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको), नवी मुंबई | मुदतवाढ |
| ८ | श्री. अनुदीप श्रीनिवास दिघे, संचालक (वित्त), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण), मुंबई | मुदतवाढ |
| ९ | श्रीम. मृदुला गिरीष इनामदार, प्राध्यापक तथा वित्तीय सल्लागार, यशदा, पुणे | मुदतवाढ |

२. वरीलप्रमाणे बदली झालेल्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी बदली अधिकाऱ्याची प्रतिक्षा न करता स्थानिक व्यवस्था करुन संबंधित अधिकाऱ्यास कार्यमुक्त करावे.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहन अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या पदावर रुजू होण्याची दक्षता घ्यावी. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. संबंधित अधिकाऱ्यांनी बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना अवगत करावे.

५. वरील अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तिक माहितीचा तपशिल HRMS मधील नमुन्यात भरुन नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत वित्त विभाग तसेच संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि. अ. धोत्रे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर *
३) संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई.
४) संचालक, संचालनालय, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई *
५) संबंधित अधिकारी यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख *
६) संबंधित अधिकारी यांचे बदली कार्यालयाचे प्रमुख *
७) संबंधित अधिकारी *
८) प्रधान सचिव (ले. व को.) यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) कक्ष अधिकारी, कोषा.प्रशा.१, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवड नस्ती कोषा.प्रशा.२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

* (संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)